अमरावती महसूल विभागातील ५ क्षेत्रिय अधिकाऱ्यांना जुन्या निर्लेखित वाहनांच्या बदली नवीन वाहने खरेदी करण्यास मंजुरी देणेबाबत..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः जेपीएस-२०१६/प्र.क्र.१६९/ई-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: ०५ ऑक्टोबर, २०१७.

संदर्भ:-

१) विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. आकाअ/साप्रवि/जी.बी.-४/कावि-९/२०१६, दि. २४/०२/२०१६.
२) विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. आकाअ/साप्रवि/जी.बी.-४/कावि-१९८/२०१७, दि. २३/०२/२०१६.
३) विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. आकाअ/साप्रवि/जी.बी.-४/कावि-२५९/२०१६, दि. १६/०९/२०१६.
४) विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. उपआ (साप्र)/जी.बी.-४/कावि-२०९/२०१७, दि. १०/०३/२०१७.
५) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. जेपीएस-२०१४/प्र. क्र. ८/ई-८, दि. १० जानेवारी, २०१७.
६) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-वाहन-२०१६/प्र.क्र.५१/१६/विनियम, दि. २१/०१/२०१७.

प्रस्तावना:-

अमरावती महसूल विभागातील लेखाशिर्ष "२०५३- जिल्हा प्रशासन" या खाली वेतन आहरित करणाऱ्या ९८ क्षेत्रीय अधिकाऱ्यांना शासकीय वाहनांची अनुज्ञेयता संदर्भ क्र. ५ येथील दिनांक १०/०१/२०१७ च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आली आहे. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती, जिल्हाधिकारी, बुलढाणा, वाशिम व अमरावती यांनी अनुक्रमे त्यांच्या संदर्भाधीन क्र.१, २, ३ व ४ येथील पत्रांन्वये त्यांच्या कार्यालयातील १) विभागीय आयुक्त, अमरावती, २) उप विभागीय अधिकारी, वाशिम, ३) उप विभागीय अधिकारी, अचलपूर, ४) तहसिलदार, संग्रामपूर व ५) तहसिलदार, नांदगांव खांडेश्वर या अधिका-यांच्या निर्लेखित केलेल्या वाहनांच्या बदली नवीन वाहन खरेदीस मंजूरी देण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:-

अमरावती महसूली विभागातील या शासन निर्णयासोबतच्या सहपत्र -अ॰ मध्ये नमूद केलेल्या १) विभागीय आयुक्त, अमरावती, २) उप विभागीय अधिकारी, वाशिम, ३) उप विभागीय अधिकारी, अचलपूर, ४) तहसिलदार, संग्रामपूर व ५) तहसिलदार, नांदगांव खांडेश्वर या ५ क्षेत्रिय अधिकाऱ्यांना त्यांच्या पूर्वीच्या जुन्या निर्लेखित वाहनांच्या बदली नवीन वाहने खरेदी करण्यास व तदप्रित्यर्थ येणा-या

प्रत्येकी रु. ६.०० लाख याप्रमाणे एकूण रु.३०.०० लक्ष (रुपये तीस लक्ष फक्त) च्या खर्चास खालील अटींच्या अधिन राहून संबंधितांना मंजूर करण्यात येत आहे.-

१) राज्यस्तरीय वाहन आढावा समितीने मान्यता दिल्यानुसार अनुज्ञेय नवीन वाहन विहीत कार्यपद्धतीस अनुसरुन खरेदी करण्यात यावे.

२) वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक ६ येथील दिनांक २१/०१/२०१७च्या शासन निर्णयान्वये "सहपत्र - अ" मधील अधिका-यांसाठी प्रत्येकी रु.६.०० लाखांच्या किंमतीच्या मर्यादेतच वाहनांची खरेदी करण्यात यावी. वाहन खरेदीसाठी मंजूर केलेल्या अनुदानामध्ये वाहनाच्या किंमतीमध्ये सर्व करांचा समावेश आहे.

३) नवीन वाहन ज्या अधिकाऱ्यास मंजूर करण्यात आले आहे, त्या अधिकाऱ्यांनी सदर वाहनाचा वापर उक्त कार्यालयाच्या शासकीय कामकाजासाठी करावा.

४) नवीन वाहन खरेदी केल्यानंतर त्यासंबंधी अनुपालन अहवाल शासनास सादर करण्यात यावा.

२. सदर शासन निर्णयासोबतच्या सहपत्रातील अनु.क्र. १ आणि अनु. क्र. २, ३, ४ व ५ साठी येणारा खर्च अनुक्रमे "मागणी क्र. सी - १, २०५३ - जिल्हा प्रशासन (००) १०१, आयुक्त (०१) (०४) आयुक्त, अमरावती (२०५३ ०४४९)" व "मागणी क्र. सी-१, २०५३- जिल्हा प्रशासन (००) ०९४ इतर आस्थापना (०१) उप विभागीय आस्थापना (०१)(०४) आयुक्त, अमरावती (२०५३ ०१९१) १३ - कार्यालयीन खर्च" या लेखाशिर्षाखाली मंजूर अर्थसंकल्पिय तरतुदीतून भागविण्यास शासन मंजुरी देत आहे.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ.सं. क्र.३८२/विनियम, दिनांक ३०/०८/२०१७ अन्वये दिलेल्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७१००५११५६२६८०१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Nilkanth Pandurang Awhad

Digitally signed by Nilkanth Pandurang Awhad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e42a88b7548c3a7d48b7a77d85de3524cf8f2e7e0f87091223ad803d4d4a2a31, cn=Nilkanth Pandurang Awhad
Date: 2017.10.05 12:05:18 +05'30'

(नि. पां. आव्हाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.

जिल्हाधिकारी, अमरावती/ बुलढाणा/ वाशिम.

अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती.

उपविभागीय अधिकारी, वाशिम, जि. वाशिम/ अचलपूर, जि. अमरावती.

तहसिलदार, संग्रामपूर, जि. बुलढाणा/ नांदगाव - खांडेश्वर, जि. अमरावती.
प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा) -२, महाराष्ट्र, नागपूर.
जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती/ बुलढाणा/ वाशिम.
उप सचिव, वित्त विभाग (कार्यासन व्यय-९ / विनियम), मंत्रालय, मुंबई-३२.
निवड नस्ती, कार्यासन ई-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.

“सहपत्र - अ”

(शासन निर्णय क्रमांक - जेपीएस-२०१६/प्र.क्र.१६९/ई-८, दिनांक ०५ ऑक्टोबर, २०१७ सोबत)

अमरावती महसूल क्षेत्रिय स्तरावरील अधिका-यांच्या वापरातील निर्लेखित वाहनांचे विवरणपत्र

अ.क्र.	**जिल्हा**	**वाहन वापरणा-या अधिका-यांचे पदनाम**	**निर्लेखित वाहनाचा क्रमांक**
१	विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती.	अपर आयुक्त, अमरावती	एम एच २७ एए १०
२	वाशिम	उप विभागीय अधिकारी, वाशिम.	एम एच ३ ७ए ४१५७
३	अमरावती	उप विभागीय अधिकारी, अचलपूर	एम एच २७एच ६८६१
४	बुलढाणा	तहसिलदार, संग्रामपूर	एम एच २८सी ६१०७
५	अमरावती	तहसिलदार, नांदगाव- खांडेश्वर	एम एच २७एच ६८६२